Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 13 July 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ जूलै २०२५ सकाळी ११.०० वाजता**

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राज्यसभेवर उज्ज्वल देवराव निकम, सी. सदानंदन मास्टर, हर्षवर्धन शृंगला आणि डॉ. मीनाक्षी जैन या चार सदस्यांची राज्यसभेवर नियुक्ती केली आहे.

ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांनी विविध न्यायालयीन खटल्यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जिवंत पकडल्या गेलेल्या अजमल कसाब या अतिरेक्याला फाशीची शिक्षा देण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. याशिवाय इतर तीन सदस्यांत निवड झालेले हर्षवर्धन शृंगला हे माजी विदेश सचिव आहेत, तर डॉ. मीनाक्षी जैन या ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ आहेत. सी. सदनंदन मास्टर हे ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते आहेत. भारतीय संविधानाच्या कलम ८० च्या उपकलम (१) च्या उपकलम (अ) मध्ये दिलेल्या अधिकारांचा वापर करून राष्ट्रपती राज्यसभेवर काही सदस्यांची थेट निवड करू शकतात.

****

महाराष्ट्रात सध्या ३६ पैकी २४ जिल्ह्यांत विमानतळ असून ही संख्या तीसपर्यंत नेण्याचं लक्ष्य असल्याचं मुख्यमंत्री देव्रेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबई इथं काल पश्चिम प्रादेशिक नागरी विमान वाहतूक परिषदेत ते बोलत होते. केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापु राम मोहन नायडू यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

दरम्यान, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची सर्व कामं येत्या तीस सप्टेंबरपर्यंत करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिडको आणि अदानी कंपनीला दिले आहेत. रायगड जिल्ह्यात पनवेल तालुक्यात सुरू असलेल्या या प्रकल्पाच्या कामाची पाहणी काल फडणवीस यांनी केली.

नवी मुंबई विमानतळ देशात सर्वात अद्ययावत प्रकल्प ठरणार असून त्याचं काम आता अंतिम टप्प्यात आलं आहे. या विमानतळावर दोन धावपट्ट्या असणार आहेत, तसंच जलमार्ग, रस्तेमार्ग, मेट्रो मार्गानं हे विमानतळ जोडण्यात येणार आहे.

****

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीत शिकवणी वर्ग हे अडथळे असल्याचं मत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केलं आहे. राजस्थानच्या कोटा इथं ट्रिपल आयटीच्या संस्थेच्या दीक्षांत समारंभात ते काल बोलत होते. शिकवणी वर्गांच्या जाहिरातींवरही त्यांनी आक्षेप घेतला. या जाहिरातींसाठी पैसा कुठून येतो, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या समस्येवर चिंता व्यक्त करतांना पारंपरिक मार्ग वगळून इतर नव्या क्षेत्रातल्या संधींकडेही लक्ष देण्याची गरज असल्याचं धनखड यांनी अधोरेखित केलं.

****

अहमदाबाद विमान दुर्घटनेचा प्राथमिक अहवाल आला असून सखोल चौकशीद्वारेच अंतिम अहवाल प्राप्त होईपर्यंत कोणतेही निष्कर्ष काढू नयेत असं केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. ते काल पुण्यात आयोजित रोजगार मेळाव्यानंतर वार्ताहरांशी बोलत होते.

प्राथिमिक अहवाल एक महिन्यात आला असून एकंदर प्रक्रिया पुर्ण वेगात सुरू आहे. पूर्वी विमान ब्लॅक बॉक्स परदेशात पाठवावे लागायचे, मात्र देश आत्मनिर्भर झाल्यानं त्यांच्या तपासणीचं काम आपल्याकडेच होत असल्याचं ते म्हणाले.

****

भारतीय न्यायव्यवस्था विलक्षण आव्हानात्मक परिस्थितीत असून त्यात मोठ्या सुधारणांची गरज असल्याचं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं आहे. काल, हैदराबादमध्ये नालसार विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. वर्षानुवर्षं चालणारे खटले–तुरुंगात खितपत पडलेले आरोपी ही चिंतेची बाब असल्याचंही ते म्हणाले. न्यायमूर्ती गवई यांनी भावी कायदेतज्ज्ञांना जबाबदारीनं आणि प्रामाणिकपणे न्यायव्यवस्थेत सुधारणा करण्याचं आवाहन केलं. परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन पालकांवर आर्थिक बोजा टाकू नका, असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या या पदाच्या राजीनामा देण्याच्या प्रसारमाध्यमांमध्ये आलेल्या बातम्या हा फक्त खोडसाळपणा असल्याचं पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. आपला पक्ष एका नियमानुसार – शिस्तीनुसार चालत असून जयंत पाटील हेच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असल्याचं आव्हाड यांनी समाजमाध्यम संदेशात म्हटलं आहे.

****

पालघर जिल्ह्यातल्या डहाणू तालुक्यात आरोग्य तपासणी शिबिरात अनुपस्थित राहिल्यानं भरारी पथकातल्या एका डॉक्टरची सेवा समाप्त करण्यात आली. चौकशी अहवालात सेवा कसूर स्पष्ट झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिका–यांच्या मान्यतेनं जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली.

****

मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यांवर, दक्षिण कोकण आणि विदर्भात वीजा आणि जोराच्या वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

****

भारताच्या महिला संघानं इंग्लंडविरुद्धच्या क्रिकेट टी–ट्वेंटी मालिकेत तीन – दोन अशा फरकानं जिंकून एतिहासिक विजय नोंदवला आहे.

महिला क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्ध भारताचा हा पहिलाच टी–ट्वेंटी मालिका विजय आहे. मालिकावीर म्हणून भारताची गोलंदाज नल्लापुरेड्डी श्री चराणी हिला गौरवण्यात आलं. काल, बर्मिंगहॅम इथं झालेला मालिकेतला पाचवा अंतिम सामना इंग्लंडच्या महिला संघानं पाच गडी राखून जिंकला. तथापि, याआधीच भारतानं तीन–एक अशी विजयी आघाडी घेतलेली होती. दरम्यान, भारताची टी – ट्वेंटी कर्णधार हरमनप्रीत कौरनं ३३४ आंतरराष्ट्रीय सामने खेळत भारतीय महिला क्रिकेटमध्ये सर्वाधिक सामने खेळणारी पहिली क्रिकेटपटू बनली आहे.

****